महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.१सी/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# दुरूस्ती चिठ्ठी क्र. ९० दिनांक ०६/०४/ २०२२

**(म.रा.वि.वि.कं.मर्या., वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम - २००५)**

**विषय:- मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल पिटिशन क्र. ३१२३/२०२० मध्ये दि. ०५.०५.२०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करणेबाबत.**

**संदर्भ:-** १) सुधारपत्र क्र. ७८ दि.२१.०१.२०१९.
२) सुधारपत्र क्र. ७९ दि.१६.०३.२०१९.
३) सुधारपत्र क्र. ८२ दि. १६.०९.२०१९
४) शासन निर्णय क्र. बीसीसी २०२१/प्र.क्र.३८७/१६-ब (ए) दि. ०६.०७.२०२१.

आरक्षण कायदा - २००४ नुसार मागासवर्गीयांच्या शासकीय सेवेतील आरक्षणांच्या आदेशाची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी शासन स्तरावर वेळोवेळी शासन निर्णय परिपत्रकान्वये सूचना / तरतुदी निर्गमित केल्या आहेत व त्याची अंमलबजावनी कंपनीत वेळोवेळी करण्यात आलेली आहे.

२. महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण (सुधारणा) अधिनियम २०१९ (सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ७) दि.०३ जुलै, २०१९ अन्वये राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील सरळसेवा प्रवेशाच्या एकुण नियुक्त्यांच्या १३% (तेरा टक्के) इतक्या जागा द्या, मराठा समाजासह सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गासाठी निश्चित केलेल्या होत्या. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.५८१ए/१६-ब दि. ०४.०७.२०१९ अन्वये सरळसेवा प्रवेशाकरीता सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरीता १३% आरक्षणाची तरतूद करून, सुधारीत बिंदुनामावली विहीत केलेली आहे. त्यानुसार म.रा.वि.संचालक मंडळ, ठराव क्र. १८३७ दि. ०३.०८.२०१९ अन्वये कंपनीमध्ये सरळसेवा प्रवेशाकरीता सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरीता महाराष्ट्र शासनाच्या धर्त्तीवर पदे राखीव ठेवण्यास कंपनीच्या म.रा.वि.वि.कं.मर्या., वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम - २००५ शी संलग्न परिशिष्ट 'क' चे जोडपत्र - १ मध्ये सुधारणा करून कंपनीचे सुधारपत्र क्र. ८२ दि.१६.०९.२०१९ अन्वये अंगीकृत केलेले आहे.

३. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. ०५.०५.२०२१ रोजी अंमित निर्णय देऊन सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६२ दि. ३०.११.२०१८. महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८ येथील आरक्षण अधिनियम २०१८ अवैध ठरवून एसईबीसी वर्गाचे आरक्षण रद्द केले आहे.

४. आता, मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल पिटिशन क्र.३१२३/२०२० मध्ये दि. ०५.०५.२०२१ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरून शासन निर्णय क्र. बीसीसी २०२१/प्र.क्र.३८७/१६-ब (ए) दि. ०६.०७.२०२१ अन्वये राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय / निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीसाठी शासन निर्णय दि. ०४.०७.२०१९ अन्वये विहित करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारीत केलेली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणास स्थगिती दिल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दि. ०९.०९.२०२० पासून शासनाच्या सेवेतील, सरळसेवा भरतीसाठी शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेली बिंदुनामावली शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट - 'अ' व परिशिष्ट - 'ब' नुसार कंपनीत अंगीकृत करण्यास सक्षम अधिकारी यांनी मंजुरी प्रदान केलेली आहे.

५. या अनुषंगाने म.रा.वि.वि.कं.मर्या. वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम - २००५ चे सुधारपत्र क्र. ८२ दि. १६.०९.२०१९ अधिक्रमीत करण्यात येऊन दि. ०६.०७.२०२१ च्या शासन निर्णयाच्या धर्तीवर सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या मंजूरी नुसार म.रा.वि.वि.कं.मर्या. वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम - २००५ शी संलग्न परिशिष्ट - १ मध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

६. सर्व संबंधीत नियुक्ती अधिकाऱ्यांना सूचीत करण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयाचे अवलोकन करून त्यामधील आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे. शासन निर्णयाची प्रत सोबत अवलोकनार्थ जोडलेली आहे.

७. सदर सुधारपत्र कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत:** शासन निर्णय - दि. ०६.०७.२०२१

(ओम प्रादीकर)
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.

२) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

५) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

७) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल पिटिशन क्र.३१२३/२०२० मध्ये दि.५ मे,२०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

**शासन निर्णय क्रमांक : बीसीसी- २०२१/प्र.क्र.३८७ /१६-ब(ए)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दिनांक : ०६ जूलै, २०२१

वाचा:-

१. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८. महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८.

२. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती , विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१.

३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी१०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७.

४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२.०२.२०१९.

५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०१९/प्र.क्र.११८ए/२०१९/१६-ब, दि. १६.२.२०१९ व शासन शुध्दीपत्रक दि. १८.२.२०१९

६. मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी दि.२७ जुन,२०१९ रोजी जनहित याचिका क्र १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिलेला निर्णय

७. महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण (सुधारणा) अधिनियम २०१९ (सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.७) दि.३ जुलै,२०१९

८. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र. ५८१ ए /१६-ब, दि. ४.७.२०१९.

९. मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल पिटिशन क्र.३१२३/२०२० मध्ये दि.५ मे,२०२१ रोजी दिलेला निर्णय

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण (सुधारणा ) अधिनियम २०१९ (सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.७) दि.३ जुलै,२०१९ राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील सरळसेवा प्रवेशाच्या एकूण नियुक्त्यांच्या १३% (तेरा टक्के) इतक्या जागा ह्या, मराठा समाजासह सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गासाठी निश्चित केल्या आहेत. त्याअनुषंगाने संदर्भाधिन क्र.८ येथील दि.४.७.२०१९ च्या निर्णयान्वये एसईबीसी वर्गाच्या १३ टक्के आरक्षणासह सरळसेवा भरतीकरीता सुधारित बिंदूनामावली विहित करण्यात आली होती.

मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी दि.२७ जुन,२०१९ रोजी जनहित याचिका क्र १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिलेल्या निर्णयाविरूद्ध मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या सिव्हिल पिटिशन क्र.३१२३/२०२० मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.५ मे,२०२१ रोजी अंतिम निर्णय देऊन संदर्भ क्र.१ येथील आरक्षण अधिनियम, २०१८ अवैध ठरवून एसईबीसी वर्गाचे आरक्षण रद्द केले आहे.मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी संदर्भ क्र.८ येथील दि.४.७.२०१९ चा शासन निर्णयान्वये सरळसेवा भरतीकरीता विहित करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.त्यानुसार सरळसेवा भरतीकरीता पुढीलप्रमाणे सुधारीत बिंदुनामावली विहित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे-

**शासन निर्णय :-**

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल पिटिशन क्र.३१२३/२०२० मध्ये दि.५ मे,२०२१ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरून राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय / निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीसाठी संदर्भ क्र. ८ येथील दि.४.७.२०१९ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारीत करून मा.सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणास स्थगिती दिल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दि.९ सप्टेंबर, २०२० पासून शासकीय / निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीसाठी सोबतच्या **परिशिष्ट-अ** व **परिशिष्ट-ब** नुसार सुधारित बिंदुनामावली विहित करण्यात येत आहे.सर्व शासकीय / निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीकरीता या बिंदुनामावलीचा वापर करण्यात यावा.

२. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदान प्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्त्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

३. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२१०७०६१५२९०७१९०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rasik Ambadas Khadse

Digitally signed by Rasik Ambadas Khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], cn=Rasik Ambadas Khadse
Date: 2021.07.06 16:09:56 +05'30'

(र.अं.खडसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई.
२) मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई.

३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
५) मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
६) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य व संसद सदस्य,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
७) मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१६) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई (प्रत नोंदणीकृत डाकद्वारे),
१७) प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद (प्रत नोंदणीकृत डाकद्वारे),
१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (प्रत नोंदणीकृत डाकद्वारे),
१९) सचिव,राज्य निवडणूक आयोग (प्रत नोंदणीकृत डाकद्वारे),
२०) सचिव,राज्य माहिती आयोग (प्रत नोंदणीकृत डाकद्वारे),
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२२) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२३) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२४) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२५) संचालक, समाजकल्याण, पुणे,
२६) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२७) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२८) संचालक, सेवायोजन, मुंबई,
२९) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३०) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३३) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३४) सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३५) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३६) सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३७) निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

## परिशिष्ट - अ

## सरळसेवा भरतीकरीता १०० बिंदूनामावली

| बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र | प्रवर्ग | बिंदु क्र | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ३५ | इतर मागास वर्ग | ६९ | इतर मागास वर्ग |
| २ | अनुसूचित जमाती | ३६ | अराखीव | ७० | अराखीव |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३७ | अनुसूचित जाती | ७१ | अनुसूचित जमाती |
| ४ | भटक्या जमाती (ब) | ३८ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | ७२ | अराखीव |
| ५ | इतर मागास वर्ग | ३९ | इतर मागास वर्ग | ७३ | अनुसूचित जाती |
| ६ | अराखीव | ४० | अराखीव | ७४ | अराखीव |
| ७ | भटक्या जमाती (क) | ४१ | विमुक्त जाती (अ) | ७५ | इतर मागास वर्ग |
| ८ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | ४२ | अराखीव | ७६ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक |
| ९ | इतर मागास वर्ग | ४३ | अनुसूचित जाती | ७७ | भटक्या जमाती (ड) |
| १० | अराखीव | ४४ | अराखीव | ७८ | अराखीव |
| ११ | भटक्या जमाती (ड) | ४५ | इतर मागास वर्ग | ७९ | इतर मागास वर्ग |
| १२ | अनुसूचित जाती | ४६ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | ८० | अराखीव |
| १३ | अराखीव | ४७ | भटक्या जमाती (ब) | ८१ | अनुसूचित जाती |
| १४ | अराखीव | ४८ | अराखीव | ८२ | अराखीव |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग | ४९ | इतर मागास वर्ग | ८३ | विमुक्त जाती (अ) |
| १६ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | ५० | अराखीव | ८४ | अराखीव |
| १७ | इतर मागास वर्ग | ५१ | अनुसूचित जाती | ८५ | इतर मागास वर्ग |
| १८ | अराखीव | ५२ | अराखीव | ८६ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक |
| १९ | इतर मागास वर्ग | ५३ | अनुसूचित जमाती | ८७ | विशेष मागास प्रवर्ग |
| २० | अराखीव | ५४ | अराखीव | ८८ | अराखीव |
| २१ | अनुसूचित जाती | ५५ | इतर मागास वर्ग | ८९ | इतर मागास वर्ग |
| २२ | अराखीव | ५६ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | ९० | अराखीव |
| २३ | अनुसूचित जमाती | ५७ | भटक्या जमाती (क) | ९१ | अनुसूचित जाती |
| २४ | अराखीव | ५८ | अराखीव | ९२ | अराखीव |
| २५ | इतर मागास वर्ग | ५९ | इतर मागास वर्ग | ९३ | अनुसूचित जमाती |
| २६ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | ६० | अराखीव | ९४ | अराखीव |
| २७ | अनुसूचित जाती | ६१ | अनुसूचित जाती | ९५ | इतर मागास वर्ग |
| २८ | अराखीव | ६२ | अराखीव | ९६ | अराखीव |
| २९ | इतर मागास वर्ग | ६३ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| ३० | अराखीव | ६४ | अराखीव | ९८ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक |
| ३१ | भटक्या जमाती (क) | ६५ | इतर मागास वर्ग | ९९ | भटक्या जमाती (ब)/(क) |
| ३२ | अराखीव | ६६ | अराखीव | १०० | अराखीव |
| ३३ | अनुसूचित जमाती | ६७ | अनुसूचित जाती | | |
| ३४ | अराखीव | ६८ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | | |

## परिशिष्ट-ब
## प्रवर्गनिहाय आरक्षित बिंदु

<table>
<tr><th>अक्र</th><th>प्रवर्ग</th><th>आरक्षणाची टक्केवारी</th><th colspan="2">बिंदु क्रमांक</th></tr>
<tr><td>१</td><td>अनुसूचित जाती</td><td>१३ %</td><td colspan="2">१, १२, २१, २७, ३७, ४३, ५१, ६१, ६७, ७३, ८१, ९१, ९७</td></tr>
<tr><td>२</td><td>अनुसूचित जमाती</td><td>७ %</td><td colspan="2">२, २३, ३३, ५३, ६३, ७१, ९३</td></tr>
<tr><td>३</td><td>विमुक्त जाती (अ)</td><td>३%</td><td colspan="2">३, ४१, ८३,</td></tr>
<tr><td>४</td><td>भटक्या जमाती (ब)</td><td>२.५%</td><td>४, ४७</td><td rowspan="2">९९(ब/क)</td></tr>
<tr><td>५</td><td>भटक्या जमाती (क)</td><td>३.५%</td><td>७, ३१, ५७,</td></tr>
<tr><td>६</td><td>भटक्या जमाती (ड)</td><td>२%</td><td colspan="2">११, ७७</td></tr>
<tr><td>७</td><td>विशेष मागास प्रवर्ग</td><td>२%</td><td colspan="2">१५, ८७</td></tr>
<tr><td>८</td><td>इतर मागास प्रवर्ग</td><td>१९%</td><td colspan="2">५, ९, १७, १९, २५, २९, ३५, ३९, ४५, ४९, ५५, ५९, ६५, ६९, ७५, ७९, ८५, ८९, ९५</td></tr>
<tr><td>९</td><td>आर्थिकदृष्टया दुर्बल घटक</td><td>१०%</td><td colspan="2">८, १६, २६, ३८, ४६, ५६, ६८, ७६, ८६, ९८</td></tr>
<tr><td>१०</td><td>अराखीव</td><td>३८%</td><td colspan="2">६,१०,१३,१४,१८,२०,२२,२४,२८,३०,३२,३४,३६,४०,४२, ४४,४८,५०,५२,५४,५८,६०,६२,६४,६६,७०,७२,७४,७८, ८०,८२,८४,८८,९०,९२,९४ ,९६,१००.</td></tr>
</table>

************